**कृपया प्रसिध्दीसाठी** **28 एप्रिल 2009**

## राम नाईक सहाव्यांदा लोकसभेवर जाणार : गोपाळ शेट्टी

**मुंबई, मंगळवार :** "उत्तर मुंबई मतदार संघातील भाजपा-शिवसेना युतीचे उमेदवार श्री. राम नाईक आता सहाव्यांदा लोकसभेवर निवडून जातील. हा जनतेचा कौल विविध मतचाचण्यांमधूनही स्पष्ट झाला आहे," असा विश्वास भाजपा-मुंबईचे अध्यक्ष श्री गोपाळ शेट्टी यांनी व्यक्त केला आहे.

श्री. गोपाळ शेट्टी स्वतः उत्तर मुंबईतील बोरीवली मतदार संघातून भाजपाचे आमदार म्हणूनही निवडून आले आहेत. या विधानसभेत 1978 मध्ये श्री. राम नाईक यांनी भाजपाच्या विजयाची मुहूर्तमेढ रोवली होती. त्यानंतर आता उत्तर मुंबई हा भाजपा-शिवसेना युतीचा बालेकिल्ला म्हणूनच ओळखला जातो. मतदार संघांच्या पुनर्रचनेनंतर बोरीवलीचे उत्तर मुंबईतीलच तीन विधानसभा मतदार संघात बोरीवली, दहिसर, मागाठणे मध्ये रुपांतर झाले आहे. या तीन विधानसभा क्षेत्रांप्रमाणेच चारकोप, मालाड पश्चिम व कांदिवली पूर्व मतदार संघातूनही युतीचे उमेदवार श्री. राम नाईक यांनाच आघाडी मिळेल यात शंका नाही, असा विश्वास श्री. गोपाळ शेट्टी यांनी व्यक्त केला. संपूर्ण मतदार संघात गेले महिनाभर चाललेल्या निवडणूक प्रचाराच्यांवेळी मतदारांनी दिलेला उत्स्फुर्त प्रतिसाद तर पुन्हा एकदा उत्तर मुंबई भाजपा-शिवसेना युतीचाच खासदार निवडणार याची ग्वाही देतोच, पण अलिकडेच ख्यातकीर्त इंग्रजी वृत्तसमुहाच्या मतचाचणीमधूनही हाच कौल स्पष्टपणे व्यक्त झाला आहे, असेही श्री. शेट्टी म्हणाले.

या संदर्भात माहिती देताना भाजपा-उत्तर मुंबईचे अध्यक्ष व श्री. राम नाईक यांचे निवडणूक प्रमुख श्री. योगेश सागर म्हणाले,"शनिवारी एका प्रसिध्द इंग्रजी वृत्तसमुहाने व्यावसायिक, प्रशासकीय अधिकारी, पत्रकार, समाजसेवी संस्था, आदी उत्तर मुंबईतील विविध क्षेत्रातील प्रतिथयश व्यक्तिंची मतचाचणी घेतली. या मत चाचणीच्या निष्कर्षांमध्ये श्री. राम नाईक हेच द्रष्टे नेते असून ते देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देतात (72 टक्के लोकांचे मत), काँग्रेसचे श्री. संजय निरुपम देशहित बघतील असे फक्त 28 टक्के लोकांना वाटते, असे स्पष्टपणे म्हटले आहे. या मतचाचणीत मतदारांना विविध प्रश्न विचारण्यात आले होते. उमेदवारांना वेगवेगळे निकष लावून त्याबाबत नामांकीत व्यक्तिंच्या या मत चाचणीमध्ये 73 टक्के लोकांनी श्री. राम नाईक मतदारांना सहज उपलब्ध असल्याचा हवाला दिला आहे, तर 77 टक्के लोकांचा विश्वास आहे की श्री. राम नाईक यांचा त्यांच्या पक्षाची ध्येय धोरणे निश्चित करण्यात मोठा सहभाग आहे. श्री. राम नाईक आपल्या तत्वांशी तडजोड करीत नाहीत असे ही या बहुसंख्य मतदारांना माहीत आहे. एवढेच नव्हे तर श्री. राम नाईकच मतदारांना अपेक्षित काम करुन त्यात यश मिळवू शकतात अशी 68 टक्के मतदारांना खात्री आहे, इतकेच नव्हे तर

श्री. राम नाईक यांनाच  मतदार संघाच्या अडीअडचणी माहीत आहेत, तेच मतदारांचे भले कशात आहे हे जाणतात असा विश्‍वासही बहुसंख्य मतदारांनी या मतचाचणीत व्यक्त केला आहे.  एवढेच नव्हे तर मतदार संघात सर्वाधिक प्रगत विचारांचे नेते आहेत, असा निष्कर्षही या चाचणीतून काढण्यात आला आहे."

"मी माझ्या मतदारांना जनसेवेचे व्रत अविरत सुरु ठेवण्याचे वचन दिले आहे.  आजवर मी केलेले काम बघून या निष्कर्षाला मतदार आले आहेत याबद्दल मी ऋणी आहे.  उत्तर मुंबईचे सुजाण मतदार मला पुन्हा एकदा त्यांच्या सेवेसाठी लोकसभेत पाठवतील, असा विश्‍वास मला वाटतो," असे यावेळी श्री. नाईक म्हणाले.

"ही मतचाचणी म्हणजे झलक आहे.  उत्तर मुंबईतील मतदारांच्या मनातील भावनांचे प्रतिबिंब या चाचणीत आहे.  परंतु प्रत्यक्ष मतदानातून याहीपेक्षा उज्ज्वल यश देऊन मतदारांनी श्री. राम नाईक यांना सहाव्यांदा लोकसभेत पाठवावे ", असे आवाहनही उत्तर मुंबई भाजपाचे अध्यक्ष श्री. योगेश सागर यांनी केले आहे.

**(विनोद शेलार)**
**प्रसिध्दि प्रमुख**
**मोबाईल क्र. 9867689540**